**प्रसिध्दी पत्रक** दिनांक ०८/०४/२०२६

आलोसे - डॉ.रमेश दगडोबा खंदारे, वय ४९ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद वैदयकीय अधिकारी, ( वर्ग अ ) जिल्हा सामान्य रूग्णालय परभणी, अतिरिक्त पदभार वैदयकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, पालम ता.पालम जि.परभणी . यांनी तक्रारदार यांच्याकडून ४०,०००/- रूपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | परभणी. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे पालम जि. परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | डॉ.रमेश दगडोबा खंदारे, वय ४९ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद वैदयकीय अधिकारी, ( वर्ग अ ) जिल्हा सामान्य रूग्णालय परभणी, अतिरिक्त पदभार वैदयकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, पालम ता.पालम जि.परभणी |
| लाच मागणी रक्कम | ५०,०००/- ( पन्नास हजार रूपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | ४०,०००/- ( चाळीस हजार रूपये ) |
| सापळा अधिकारी | श्री.बाबासाहेब थोरे, पोलीस निरीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र नांदेड |
| तपास अधिकारी | श्री.महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि. परभणी |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे भावाने ग्रामीण रूग्णालय पालम, येथील स्वच्छता सेवासाठी कोटेशन बेसवर टेंडर भरले होते. सदर टेंडर मंजूर करनेकामी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दि. ०२/०४/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे भावाचे नावाने परिवर्तन लेबर कॉन्ट्रॅक्टर अ‍ॅड मल्टी सर्विस फर्म आहे. सदर फर्म चे कामकाज हे तक्रारदार पाहतात. सदर फर्म मार्फत दि.२७/०३/२०२६ रोजी तक्रारदार यांचे भावाने ग्रामीण रूग्णालय पालम, येथील स्वच्छता सेवासाठी कोटेशन बेसवर टेंडर भरले होते. सदर टेंडर मंजूर करनेकामी डॉ.रमेश खंदारे, वैदयकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, पालम हे ५०,०००/- रूपये लाचमागणी करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>त्यावरून दि.०८/०४/२०२६ रोजी ग्रामीण रूग्णालय, पालम येथे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डॉ. रमेश खंदारे, वैदयकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, पालम यांनी तक्रारदार यांचे स्वच्छता सेवाचे टेंडर मंजुर करणेकामी पंचासमक्ष तडजोड अंती ४०,०००/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच तक्रारदार यांचे ग्रामीण रूग्णालय, पालम येथील स्वच्छता सेवाचे टेंडरचे मंजुर आदेश डॉ. रमेश खंदारे यांनी तक्रारदार यांना देऊन लाच रक्कम लगेच घेवून येण्यास सांगितल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले.<br>सापळा कार्यवाही दरम्यान दि.०८/०४/२०२६ रोजी ग्रामीण रूग्णालय, पालम परिसरात करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान डॉ. रमेश खंदारे, वैदयकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, पालम यांनी तक्रारदार यांच्याकडून शासकीय पंचासमक्ष लाच रक्कम ४०,०००/- रू. स्वत: स्विकारलेवरून आलोसे यांचे विरूध्द पो.स्टे पालम येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच आलोसे यांच्या घराची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री.संदीप पालवे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक कदम, ला.प्र.वि नांदेड परिक्षेत्र नांदेड, पोलीस उप अधीक्षक श्री. महेश पाटणकर ला.प्र.वि परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. बाबासाहेब थोरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड , पोलीस निरीक्षक श्री. अल्ताफ मुलाणी, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोशि/१६३१ शेख जिब्राईल ला.प्र. वि. परभणी यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- १) **मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड**<br>:- २) कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी नानलपेठ पोलीस स्टेशनच्या बाजुला , शनिवार बाजार, नानलपेठ परभणी. |
| ई - मेल | :- १) spacbnanaded@mahapolice.gov.in<br>२) dyspacbparbhani@mahapolice.gov.in दुरध्वनी क्र :– 02452&220597 |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharastra.net टोल फ्रि क्रंमाक १०६४ |
| पोलीस अधीक्षक | :- ९२२६४८४६९९ |
| पोलीस उप अधीक्षक | :- ९८७०३१३१५७ व्हॉटसअप क्रंमाक - ९२७२२११०६४. |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |

पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो परभणी

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी